N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): कोल्हापुर    P.S. (पोलीस ठाणे): शिरोळ    Year (वर्ष): 2026

   FIR No. (प्रथम खबर क्र.): 0225    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 29/06/2026 23:07 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

   1 Day (दिवस): सोमवार    Date from (दिनांक पासून): 29/06/2026    Date To (दिनांक पर्यंत): 29/06/2026

   Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 14:44 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:03 तास

   (b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 29/06/2026    Time (वेळ): 22:00 तास

   (c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 028    Date and Time (दिनांक आणि वेळ): 29/06/2026 22:00 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

   1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 0.1 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

      (b) Address (पत्ता): भूमि अभिलेख कार्यालय, शिरोळ,शिरोळ

      (c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

      District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजेंद्र अशोक सानप

(b) Father's Name (चे नाव ): अशोक सानप

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1986

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, करवीर, लक्ष्मीपूरी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, करवीर, लक्ष्मीपूरी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8208971207

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय बापू तेली | | वडील चे नाव : बापू तेली | 1. Town/Village (शहर / गाव): आळते,Tehsil (तहसील): हातकणंगले,Police Station (पोलीस ठाणे): हातकणंगले,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. दराच्या 4 चलनी नोटा | 2,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक - 29/06/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष शिरोळ पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर हजर राहुन फिर्याद देतो की,

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

मी दिनांक 29/06/2026 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.,कोल्हापूर यांनी बोलावुन घेवुन, मुळ तक्रारदार श्री.ओंकार सुधीर चौगुले, रा.हसूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचा मो.नं.7448299717 हा मोबाईल नंबर देवून, त्यांच्या तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश आम्हास दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे नमूद मोबाईल नंबरवर त्यांच्याशी संपर्क करून त्यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यावेळी मला मुळ तक्रारदार ओंकार सुधीर चौगुले, वय - 24 वर्षे, व्यवसाय-शेती, रा.हसुर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर मो.नं. 7448299717 यांनी फोन वरून कळविले की, मी वरील ठिकाणी राहणेस असून मी शेती करतो. माझे वडील सुधीर विश्वनाथ चौगुले व आई रूपाली सुधीर चौगुले हे दोघे मयत झाले असून, आमची मौजे हसूर गावातील नगर भूमापन गट क्र..60,602 व 65 मधील मिळकत ही माझे व माझी बहिण स्नेहा शुभम खामकर हिचे नावाने फेरफार व वारस नोंद होणेकरीता दिनांक 06/06/2026 रोजी फेरफार नोंद होणेकरीता भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला होता. सदर कामाचे अनुषंगाने दिनांक 25/06/2026 रोजी मी भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ येथे जावून श्री.संजय तेली, निमतानदार यांना जावून भेटलो असता, त्यांनी मला सदरची नोंद घालण्याकरीता माझे व इतर नातेवाईकांचे 03 असे एकूण 04 कामाचे वारसा नोंद व फेरफार नोंदी करीता माझेकडे सर्वांचे मिळून 2,000/-रू मागणी केली आहे. सदरबाबत मी त्यांना त्याची पावती मिळेल काय?याबाबत विचारणा केली असता, त्यांनी नाही असे सांगितले, व तुमच्या चौघांचे अर्ज माझेकडे प्रास आहेत, चारही कामे एकाचवेळी करून देतो, तुम्ही प्रत्येकी 500/-रू प्रमाणे 2,000/-रू दया, तरच काम होईल असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना पैशाची जूळणा करून भेटतो असे सांगितले होते. तरी भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ येथील श्री.संजय तेली, निमतानदार हे माझेकडे मागत असलेले पैसे हे लाच म्हणून मागणी करत असल्याची माझी खात्री झाली आहे. तरी मला त्यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. माझेत आणि श्री.संजय तेली, निमतानदार यांचे कोणतेही देवाण-घेवाणीचे व्यवहार नाहीत व त्यांचेशी माझा कोणताही वाद नाही. मी दिनांक 29/06/2026 रोजी दुपारी श्री.संजय तेली, निमतानदार, भुमी अभिलेख कार्यालय, शिरोळ यांना भेटण्यास जाणार आहे, तेव्हा त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास, त्यांचेवर आपणाकडुन कारवाई व्हावी ही विनंती म्हणुन तक्रार सांगुन, मी दिनांक 29/06/2026 रोजी दुपारी भूमि अभिलेख कार्यालय, शिरोळ येथे भेटणेस जाणार आहे. तरी तुम्ही शिरोळ ते चिंचवाड जाणारे रोडला दगडू फार्म हाऊस जवळ रस्त्याचे लगत थांबतो तेथे या, तेथे मी तुम्हाला भेटुन माझा तक्रारी अर्ज देतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार चौगुले यांना त्यांनी सांगितले ठिकाणी 13.30 वा. पर्यंत पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले.

त्यानंतर मी लागलीच मा. जिल्हा उपनिबंधक सो, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 29/06/2026 रोजी तात्काळ गोपनिय कामकाजाकरीता अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर राहण्याची समज देवून पाठविण्यास सांगितले. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरोकडील अंमलदार पोहेकाॅ/267 सुधीर पाटील, पोकाॅ/2302 कृष्णा पाटील, पोका ॅ/2363 संदीप पवार, पोकाॅ/1332 रविंद्र पाटील यांना सापळा पथकात सामील करून घेवून, त्यांना सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेली सामुग्रीसह, चालक सफौ/ गजानन कुराडे असे शासकीय

वाहन क्रमांक एम.एच.09, जी.यु.7591 वाहनासह तयार राहणेस सांगितले. त्यावेळी आम्ही मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर कार्यालयाकडील मागणी केलेले दोन शासकीय पंच 01) संदीप राजगोंडा पाटील, पद -कनिष्ठ लिपीक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, 02) स्वप्निल दगडू पाटील, पद- कनिष्ठ लिपीक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर हे 12.05 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे आले, त्यावेळी आम्ही, नमूद दोन्ही पंच व सापळा पथक व चालक सफौ/गजानन कुराडे असे शासकीय वाहन क्रमांक एम.एच.09, जी.यु.7591 मधुन कोल्हापूर- सांगली रोडने जयसिंगपूर मार्गे शिरोळ-चिंचवाड रोडने दगडू फार्म हाऊस जवळ रस्त्याकडेला मोकळया जागेत थांबलो, त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार ओंकार चौगुले यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार चौगुले यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार चौगुले यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार चौगुले यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार चौगुले व पंच नं.01 संदीप पाटील यांचेसह भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ येथे श्री.संजय तेली, निमतानदार यांची भेट घेणेकरीता जावून चौगुले यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे श्री.संजय तेली हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये MNC कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार चौगुले व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार चौगुले व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. व सदरची निवेदन घेताना मोबाईल मध्ये व्हिडीओ रेकाॅर्डींग केले आहे. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 14.44 वाजता चालु करून, तो तक्रारदार चौगुले यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार चौगुले व पंच नं.1 संदीप पाटील यांना श्री.संजय तेली यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार चैगुले यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 सीई 8640 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही, सापळा पथक व पंच नं.02 स्वप्निल पाटील असे गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार चौगुले व पंच नं.1 संदीप पाटील असे श्री.संजय तेली यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 15.11 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 संदीप पाटील यांना भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ येथे संजय तेली यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी तक्रारदार चौगुले यांचे सोबत भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ येथे गेलो. तेथे तक्रारदार चौगुले हे संजय तेली यांना भेटले, त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी तक्रारदार चौगुले "सर ते बाकीच्या दोन्हीची पण काढलाय का नोटीस..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब " हेज काय केलास..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले " ते अर्जा नुसार पाचशे रूपयन ते देतो साहेब ते पण देतो..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "ही दी..." असे म्हणाले, त्यावेळी चौगुले " देतो की..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब " दिवुन टाक , ते पण देतो चल , ते पण घेवुन जा नोटीस लागु कर, ते पण नोटीस देणार हाय मी तुला..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले " हं

तेच नोटीस, मग ते अर्जा नुसार टोटल चार अर्जाचे दोन हजार होतात..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "दोन हजार होतात..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "दोन हजार रूपये होत्यात..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "जास्त नाही रे ते..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "काय काय तर करा की..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "आठ आठशे आणि हजार रूपये घेत्यात लोक त्यात तुला पाचशे रूपये सांगितल..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "एक मिनिट एक मिनिट किती दंगा करालाय..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "जास्त कुठ सांगितल्यात आत्ताच दि की किती आणलाय दे..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "आता मला पगार सोडलाय तो ऑनलाईन सोडलाय काढुन आणुन देवु का लगेच..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "येजा येजा जा.." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार "ठीक हाय दोन दोन हजार आणु ना..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "येजा येजा..." असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार चौगुले भूमी अभिलेख कार्यालय येथून निघून आपले जवळ आलो आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार चौगुले यांना संजय तेली यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 संदीप पाटील यांचे हकीकतीस मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पंच नं.01 संदीप पाटील व तक्रारदार चौगुले यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकाॅर्डमधील रेकाॅर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार चौगुले यांचेकडे संजय तेली, निमतानदार भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ यांनी तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांचे वारस व फेरफार नोंद करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम थोडया वेळात घेवून येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाल्याने, आम्ही भूमि अभिलेख कार्यालय, शिरोळ येथील संजय तेली, निमतानदार यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार चौगुले यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 04 भारतीय चलनी नोटा अशी 2,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार चौगुले व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार चौगुले व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अँथ्रासिन लावलेले 2,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे मागील बाजुचे खिशात ठेवले. तसेच तक्रारदार चौगुले यांना भूमि अभिलेख कार्यालय, शिरोळ येथील संजय तेली, निमतानदार यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांच्या खिशातील हात रूमाल काढून तो चेह-यावरून फिरवून हातात ठेवावा असा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 15.40 वाजता सुरू करून तक्रारदार व दोन्ही पंच यांची सापळा कारवाईचे अनुषंगाने निवेदने रेकाॅर्ड केली. त्यानंतर सर्वांना सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर आमचे कडील शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये sandisk कंपनीचे 16 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची तक्रारदार व पंचांची खात्री केली. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 15.49 वाजता सुरू करून, तो तक्रारदार चौगुले यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार चौगुले व पंच नं.1 संदीप

पाटील असे तक्रारदार यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहून पासुन भूमि अभिलेख कार्यालय शिरोळकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 स्वप्निल पाटील असे आमचेकडील शासकीय चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ जवळ आलो. त्यावेळी तक्रारदार चौगुले व पंच नं.1 संदीप पाटील असे भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ या कार्यालयात गेले. आम्ही भूमि अभिलेख कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार चौगुले यांनी भूमि अभिलेख कार्यालय,

शिरोळ येथील संजय तेली यांनी पैसे स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 स्वप्निल पाटील व स्टाफ भूमी अभिलेख कार्यालयात गेलो. त्यावेळी तक्रारदार चौगुले यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 16.03 वाजता बंद करून, तात्काळ संजय तेली यांना पकडले. त्यावेळी आम्ही पंच नं.01 पाटील यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, त्यावेळी तेली साहेब "त्या प्रमाण कर ते, तेज काय घेवून आलाईस" असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "हं... देणार की...' असे म्हणाले, त्यावर तेली साहेब "देवून टाक..." असे म्हणाले, तक्रारदार चौगुले "देवू, काय थांबु का देवू..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब "दे दे..." असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार चौगुले "काय प्रॉब्लेम..." असे म्हणाले, त्यावेळी तेली साहेब " इथ ठेव हेज्यात... " असे म्हणून तेली साहेब यांनी त्यांच्या समोरील टेबलच्या उजव्या बाजूचे ड्राव्हर उघडला, त्यावेळी तक्रारदार चौगुले यांनी संजय तेली यांनी मागितलेप्रमाणे 2,000/- रूपये लाच रक्कम त्यांच्या पॅन्टच्या मागील उजव्या बाजूचे खिशातून त्यांच्या उजव्या हाताने 2000/-रू लाच रक्कम काढून टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार चौगुले यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील बाजूचे डावे खिशातील रूमाल काढून संजय तेली यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार चौगुले यांच्याकडे सापळा कारवाईवेळी काय हकिकत घडली याबाबत विचारणा करता त्यांनी पंच नं.01 यांच्याप्रमाणे एकमेळांची हकिकत सांगितली.

सदर ठिकाणी लागलीच संजय तेली यांच्या कक्षातील लाईट बंद करून सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या, त्यावेळी ड्राव्हर मधील लाच रक्कम व लाच रक्कम ठेवलेला कागद यांचेवर अल्ट्राव्हायलेट बॅटरीचे प्रकाशात तपासणी केली असता, त्यास अँन्थ्रासिन पावडरची हिरवट चकाकी दिसून आल्याने, पंचाचे समक्ष संजय तेली यांनी तक्रारदार यांना टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवण्यास सांगितलेली लाच रक्कम व ड्राव्हर मधील अँन्थ्रासिन पावडर लागलेला कागद हस्तगत केला. त्यानंतर संजय तेली, निमतानदार यांच्याकडून तक्रारदार चौगुले व त्यांचे इतर 03 नातेवाईक यांचे वारस व फेरफार नोंद करण्याकरीता भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ येथे दाखल केलेले कागदपत्रे, आवक जावक नोंदवही असे तपासकामी ताब्यात घेतले. सदर ठिकाणचे मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ शुटींग केले आहे. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही शासकीय विश्रामगृह, शिरोळ येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार ओंकार सुधीर चौगुले यांचे मौजे हसूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील मौजे हसूर गावातील नगर भूमापन गट क्र..60,602 व 65 मधील मिळकत ही माझे व माझी बहिण स्नेहा शुभम खामकर हिचे व तक्रारदार यांचे इतर 03 नातेवाईक यांचे फेरफार व वारस नोंद करणेकरीता संजय तेली, निमतानदार, भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ यांनी तक्रारदार चौगुले

यांचेकडे 2,000/- रूपये लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 2,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदार चौगुले यांचेकडून बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारल्याने त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी संजय बापू तेली, वय- 52 वर्षे, निमतानदार, भूमी अभिलेख कार्यालय, शिरोळ रा. आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Pravin Vitthal Khanapure (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)
Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Pravin Vitthal Khanapure

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

HC 16

ठाणे अंमलदार
शिरोळ पोलीस ठाणे
जि.कोल्हापूर

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**